# निशाणी क्र. ४८ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ९ ते १४ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द् झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी दि. १६/०९/२०१४ रोजी प्रस्तूत प्रतिवादींविरूध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. प्रस्तूत प्रतिवादी त्यांचे शेतीच्या कामानिमित्त गावी येवून जावून असतात त्यामुळे व त्यांचे अशिक्षितपणामुळे न्यायालयामध्ये त्यांना हजर राहता आले नाही. परंतू सदर कामी त्यांचे म्हणणे दाखल करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे कधीही भरून न येणारे असे नुकसान होणार आहे. सबब त्यांचेविरूध्द केलेले आदेश नैसर्गिक न्यायतत्वाचे दृष्टीने रद्दबातल होवून त्यांना त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

२. वादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणेस त्यांची कोणतीही हरकत नाही. परंतू त्यांना जास्तीत जास्त रक्कम जमा करणेचा आदेश व्हावा अशी विनंती वादींनी केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी क्र. ९ ते १४ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटप, पृथक कब्जा व मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. वादींनी या दाव्यात तुर्तातुर्त मनाईचा देखील अर्ज दाखल केला आहे. सदरचा दावा व तुर्तातुर्त मनाईचा अर्ज गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे व मनाई अर्जाचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू

मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे व मनाई अर्जाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संध ी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत त्यांनी वादींना खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ९ ते १४ यांनी रूपये २०००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रूपये १०००/— वादींना दयावेत व उर्वरित रक्कम विधी सेवा समिती सिंधुदुर्गला जमा करावी.

३. प्रस्तुत प्रतिवादींनी वरील पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरूध्द् झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेत येतो व कैफियत स्वीकारणेत येते.

स्थळ : देवगड
दिनांक : ०८/०७/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Balkrishna Rajaram Patil

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.07.08 17:20:29 +0530